आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

९ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार शिगेला/ विविध सभा, मुलाखती आणि भेटीगाठींमधून मतदारांपर्यंत पोहचण्याचा उमेदवारांचा प्रयत्न

- महाराष्ट्रातल्या मतदारांनी देशभक्ती, राजकीय समज आणि दूरदृष्टी दाखवून भाजपाला सलग १० वर्षं सर्वाधिक पसंती दिली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रचारसभेत प्रतिपादन

- काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आज विदर्भात सभा

- सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या अधिकृतपणे निवृत्त होणार, न्यायमूर्ती संजीव खन्ना स्वीकारणार पदभार

**आणि**

- जागतिक हॉकी संघटनेचे पुरस्कार जाहीर, भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंग वर्षातला सर्वोत्कृष्ट खेळाडू तर सर्वोत्तम गोलरक्षक ठरला पी. आर. श्रीजेश

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचारानं कमालीचा वेग घेतला आहे. विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा आणि पत्रकार परिषद आज राज्यभरात होत आहेत. वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या आणि इतर समाजमाध्यम व्यासपीठांवर आपापली भूमिका मांडून उमेदवार आणि त्यांच्या पक्षांचे प्रचारक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रानं २०१४ ते २०२४ अशी दहा वर्षं भाजपाला सातत्यानं संधी दिली, महाराष्ट्रवासीयांची देशभक्ती, राजकीय समज आणि दूरदृष्टी यातून दिसते, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अकोला इथं एका प्रचारसभेत ते बोलत होते. महाराष्ट्राच्या नागरिकांनी दाखवलेल्या या विश्वासामुळे महाराष्ट्राची सेवा करण्यात वेगळंच सुख मिळतं, असंही ते म्हणाले. पालघर जिल्ह्यातलं वाढवण बंदर देशातलं सर्वात मोठं बंदर असून त्यासाठी ८० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चार कोटी गरिबांना घरं दिली, शिवाय तीन कोटी नवीन घरं बांधायला सुरुवात केली असून यामुळे महाराष्ट्रातल्या लाखो गरिबांना पक्की घरं मिळतील, असं त्यांनी नमूद केलं. केंद्र सरकारनं मराठी भाषेला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव केला आहे, असंही प्रधानमंत्री म्हणाले. राज्यात टेक्सटाइल पार्कच्या उभारणीमुळे कापूस शेतकऱ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडी आणि काँग्रेसवर त्यांनी भ्रष्टाचाराचा, घराणेशाहीचा आरोप केला आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी पुन्हा एकदा राज्यात महायुतीचं सरकार निवडून देण्याची विनंती मतदारांना केली.

**<><><><>**

महायुती सरकारच्या काळात सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार हा शेतकरी, लाडक्या बहिणी आणि लाडक्या भावांचा होता, असं शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. ते आज परभणीत प्रचारसभेत बोलत होते. महायुती सरकारनं साडे सात अश्वशक्ती पम्पाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचं वीज बील माफ केलं, तसंच शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला, असं शिंदे म्हणाले.

**<><><><>**

महायुती सरकारनं राज्यात अनेक समाजोपयोगी योजना आणल्या असं सांगत सरकार आल्यावर चंद्रपूर इथल्या दीक्षाभूमीसाठी शंभर कोटी रुपये देऊ, असं आश्वासन भाजपा नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

चंद्रपूर इथं प्रचारसभेत ते बोलत होते. महिला आणि शेतकऱ्यांसाठीच्या योजनांचाही त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

<><><><><>

महाराष्ट्र याआधी न्याय, कायदा आणि सुव्यवस्थेसाठी ओळखलं जात असे. मात्र महायुतीचं सरकार आल्यावर इतली प्रशासन व्यवस्था कोलमडली अशी टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. राज्यात बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न असून महाराष्ट्राला पुन्हा एकदा प्रगतीपथावर आणण्यासाठी ही निवडणूक आहे, असंही खर्गे म्हणाले.

महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर महालक्ष्मी योजना, कृषी समृद्धी योजना, आरोग्य विमा, मोफत प्रवास अशा लोककल्याणकारी योजना राबवू असं आश्वासन यावेळी खर्गे यांनी दिलं. काँग्रेसचं सरकार असलेल्या राज्यांमध्ये शेतमालाला हमीभाव दिला जात असल्याचंही त्यांनी सांगितलं.

त्याआधी मल्लिकार्जुन खरगे यांनी नागपूरमध्ये दीक्षाभूमी इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला तसंच गौतम बुद्ध यांना अभिवादन केलं. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या वतीनं खर्गे यांचं स्वागत करण्यात आलं. यावेळी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार उपस्थित होते. खर्गे आज दुपारी अमरावती इथं तर संध्याकाळी सव्वा सात वाजता नागपूर उत्तर विधानसभा मतदारसंघात प्रचारसभेला संबोधित करणार आहेत.

<><><><><>

महाविकास आघाडीच्या सरकारच्या कालावधीत साडे सहा लाख कोटींचे सामंजस्य करार करून राज्यात उद्योग आणले, मात्र महायुती सरकारनं सर्व उद्योग गुजरातला नेले अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज नांदेड जिल्ह्यात लोहा-कंधार मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलत होते. महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर महिलांना दरमहा तीन हजार रुपये मदत देणार, महिलांसाठी महिला अधिकारी आणि कर्मचारी असणारी वेगळी पोलीस ठाणी राज्यभरात उभारणार अशी आश्वासनं ठाकरे यांनी या वेळी दिली. महायुतीच्या नेत्यांना निवडणुकीच्या काळात शेतकऱ्याची आठवण झाली असून हे सरकार महाराष्ट्रद्रोही असल्याचा आरोपही त्यांनी केला.

महायुती सरकारच्या काळात सोयाबीन, कापूस, डाळ, कांदा या सर्वांचे हमीभाव पडले, त्यामुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालं असं उद्धव ठाकरे आज एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले. नरेंद्र मोदी यांच्या गेल्या दहा वर्षांच्या गैरकारभाराबाबत लोक आता प्रश्न विचारत असून राज्यात महाविकास आघाडीचं सरकार येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आदित्य ठाकरे यांची आज वरळीत प्रचारसभा झाली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात यावेळी निवडणूक लढवणाऱ्या पक्षांची आणि उमेदवारांची संख्या जास्त असून त्यामुळे उमेदवारांचा कस लागणार असल्याचं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष  शरद पवार यांनी म्हटलं आहे. आज एका वृत्तवाहिनीला ते मुलाखत देत होते. शरद पवार यांनी हिंगोली इथं प्रचारसभेला संबोधित केलं. तसंच ते आज बीडमध्ये परळी आणि आष्टी इथं सभांना संबोधित करणार आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे हे यवतमाळ इथं प्रचारसभा घेणार आहेत.

**<><><><><>**

सांगली मतदारसंघातले काँग्रेसचे उमेदवार पृथ्वीराज पाटील यांच्या प्रचार सभेला आज काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम उपस्थित होते.

<><><><><>

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या रविवारी अधिकृतपणे निवृत्त होणार आहेत. त्यानंतर न्यायमूर्ती संजीव खन्ना देशाचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा काल न्यायालयात शेवटचा दिवस होता. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या निकालांमध्ये अयोध्या जमीन वाद, दोन प्रौढांनी सहमतीने ठेवलेल्या समलिंगी संबंधांना मान्यता आणि अविवाहित महिलांना गर्भपाताचा अधिकार यांचा समावेश आहे. त्यांचे हे निर्णय समाज आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे होते.

<><><><><>

देशभरात आज राष्ट्रीय विधी सेवा दिन साजरा केला जात आहे. नागरीकांमध्ये कायदेविषयक जनजागृती व्हावी आणि समाजातल्या वंचित घटकांसह सर्व नागरिकांना न्याय प्रक्रियेचा लाभ मिळावा, हा यामागचा उद्देश आहे. नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबाबत शिक्षण देण्यासाठी तसंच विविध प्रकल्प आणि योजनांच्या माध्यमातून विवाद निवारण यंत्रणा मजबूत करुन अधिक न्याय्य समाजाची निर्मिती करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

<><><><><>

विधानसभा निवडणूकीच्या निमित्तानं स्वीप अंतर्गत मतदार जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. मुंबईत घाटकोपर रेल्वे स्थानकाबाहेर आज पथनाट्य सादर करुन नागरिकांना त्यांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग वाढवण्याबाबत आवाहन करण्यात आलं.

स्वीप उपक्रमांतर्गत नवी मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आज मतदानाबाबत सामुहिक प्रतिज्ञा केली. महापालिकेच्या मुख्यालयातल्या ज्ञानकेंद्रात झालेल्या या शपथ ग्रहण सोहळ्याला महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदेही उपस्थित होते.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात वाडा पोलिसांनी आज एका बनावट एटीएम व्हॅन मधली ३ कोटी ७० लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली. नवी मुंबईतल्या ऐरोली इथून आणलेली ही रक्कम विक्रमगड बँकेत नेली जात असल्याचा बनाव करण्यात येत होता. मात्र त्याबाबत समाधानकारक उत्तरं तसंच पुरावे न मिळाल्यामुळं पोलिसांनी ही रक्कम जप्त केली. या रकमेचा वापर निवडणुकीसाठी केला जाणार होता का, याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

<><><><><>

केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत एनसीसीएफच्या वतीने खरीप हंगाम २०२४-२५ साठी मूग, उडीद, सोयाबीन खरेदी केंद्र हिंगोलीत सुरु करण्यात आली आहे. या खरेदी केंद्रांवर मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी १ ऑक्टोबर पासून नोंदणी सुरु झाली आहे. या केंद्रावर ७ जानेवारी पर्यंत मूग आणि उडीद तर १२ जानेवारी पर्यंत सोयाबीन खरेदी सुरु करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी

आपल्या तालुक्यातल्या केंद्रावर संपर्क करुन नोंदणी करण्याचं आवाहन जिल्हा पणन अधिकारी, हिंगोली यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय हॉकी संघटनेतर्फे ओमानमध्ये ४९वे एफआयएच पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आले. भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंगला वर्षातल्या सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडूचा पुरस्कार जाहीर करण्यात आला तर माजी खेळाडू पीआर श्रीजेशला वर्षातील सर्वोत्तम गोलरक्षक म्हणून गौरविण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**